महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग
हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
दुरध्वनी क्र. ०२१४१/२२२११८ फॅक्स क्र. ०२१४१/२२७४५१, Email: dcraigad@gmail.com

**(सामान्य शाखा)** **क्र.साशा/ब-५/करोना विषाणूबाबत आवाहन /२०२०** **दि.१८/०३/२०२०**

# आवाहन

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केलेल्या आहेत. शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्यानुसार राज्यातील आंगणवाड्या, शाळा, महाविद्यालये, चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायाम शाळा, नाट्यगृहे, मॉलस् इ. स्वरुपाच्या जमाव / लोकांचा समूह एकत्र येण्याची ठिकाणे दि.३१/०३/२०२० अखेरपर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत. जेणे करुन राज्यात कोरोना विषाणूच्या प्रसारास प्रतिबंध करता येईल.

या कार्यालयाकडून यापुर्वीच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) नुसार रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीत पूर्व परवानगीशिवाय पाच अगर पाचाहून अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही प्रकारच जमाव जमविण्यास किंवा मिरवणूक काढण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

याद्वारे, रायगड जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, शासकीय कार्यालयांमध्ये दि.३१ मार्च, २०२० रोजी पर्यंत प्रत्यक्ष भेट न देता ईमेल व्दारे आपले अर्ज/तक्रारी संबंधित कार्यालयास पाठविण्यात याव्यात. जेणेकरुन गर्दी होवून करोना विषाणू संक्रमण होणार नाही. संबंधित कार्यालय प्रमुखांना ईमेलव्दारे प्राप्त झालेल्या अर्ज/तक्रारीबाबत ७ दिवसांत कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. कार्यालयांचे ईमेल आयडी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या www.raigad.gov.in अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी रायगड

जिल्हाधिकारी, रायगड
Collector of Raigad